## निवडक

### मोरजी सार्वजनीक गणेशोत्सव विश्वस्त मंडळाची २२ रोजी सभा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १०** : मोरजी येथील सार्वजनीक गणेशोत्सव विश्वस्त मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २२ रोजी सकाळी १०.३० वाजता श्री देव कळस मांगर सभागृह मोरजी येथे आयोजीत करण्यात आली आहे. या सभेत मागील सभेचा इतिवृतांत वाचुन कायम करणे, वर्ष २०२५ ची नवीन उत्सव समीती निवडणे, वर्ष २०२४-२५चा आर्थीक अहवाल सादर करणे, आणी ऐनवेळी येणाऱ्या वर्षा विषयावर विषयावर चर्चा होईल. तरी सर्व विश्वस्तानी सभेचा उपस्तीत राहावे असे आवाहन विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष अमीत-वसेत शेटगावकर याने केले आहे.

---

### घोटेली येथे १५ रोजी भजन कार्यशाळा

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. १०** : घोटेली नं २ केरी-सत्तरी येथील कला सांस्कृतिक भजनी मंडळातर्फे रविवार दि.१५ जून रोजी दुसऱ्या भजन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.सदर कार्यशाळा श्री सातेरी सभामंडप घोटेली नं. २ केरी-सत्तरी येथे सकाळी ९.३० ते संध्याकाळी ५.३० या कालावधीत होणार असून विठ्ठल शिरोडकर या कार्यशाळेत मार्गदर्शन करणार आहेत.अधिक माहितीसाठी व नावनोंदणीसाठी आदित्य गावस (८३९०८८४०२४), संतोष गावस (९८३४९०७३०३) किंवा नारायण पडवळकर(८६९८४८५९८६) या क्रमांकावर संपर्क साधावा. चहापाणी व जेवणाची सोया आयोजकांतर्फे करण्यात येईल.

---

### बाया सूर्ला ट्रान्सफॉर्मरवर आज खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. १०** : बुधवार दि. ११ रोजी बाया सूर्ला वीज ट्रान्सफॉर्मरवर दुपारी ३ ते संध्याकाळी ६ यावेळेत वीज वाहिन्यांना लागणाऱ्या झाडांच्या फांद्या तोडायच्या असल्याने तसेच वीज वाहिन्यांच्या देखभालीचे काम करायचे असल्याने बाया सूर्ला परिसरात वीजपुरवठा असणार नाही. यापूर्वी १० रोजी वीज खंडित करण्यात येणार होती परंतु वट पौर्णिमा कार्यक्रमामुळे सदर ११ रोजी करण्यात आली आहे. यावेळी ग्राहकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

### खोडगिणे सूर्ला ट्रान्सफॉर्मरवर आज खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. १०** : मंगळवार दि. १० रोजी खोडगिणे सूर्ला वीज ट्रान्सफॉर्मरवर सकाळी ९.३० ते दुपारी २ यावेळेत वीज वाहिन्यांना लागणाऱ्या झाडांच्या फांद्या तोडायच्या असल्याने तसेच वीज वाहिन्यांच्या देखभालीचे काम करायचे असल्याने खोडगिणे,बाराजण सूर्ला या परिसरात वीजपुरवठा असणार नाही. यापूर्वी १० रोजी वीज खंडित करण्यात येणार होती परंतु वट पौर्णिमा कार्यक्रमामुळे सदर ११ रोजी करण्यात आली आहे. यावेळी ग्राहकांनी सहकार्य करावे,असे आवाहन करण्यात आले आहे.

---

### पतंजलीतर्फे योगदिनी निःशुल्क योग प्रशिक्षक उपलब्ध

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १०** : आंतरराष्ट्रीय योग दिन २१ जूनला जगभर साजरा करण्यात येत असतो.त्यामुळे प्रशासकीय आदेशानुसार यावर्षी योग दिन शाळा, महाव्दियालये सरकारी तसेच निमसरकारी व खाजगी कार्यालये विविध संस्था व संघटना मध्ये साजरा करण्यात येणार आहे. त्यांनुसार योगदिनी सहकार्य करण्यासाठी पतंजलि योगपिठाचे प्रशिक्षित योग शिक्षक निःशुल्क उपलब्ध आहेत. पेडणे तालुक्यातील कुठल्याही शाळेला, महाविद्यालयाला, सरकारी निमसरकारी, खाजगी कार्यालये संस्थाना जर योग शिक्षकाची गरज असेल तर त्यांनी खालील नंबरवर संपर्क साधावा, पांडुरंग पिंगे- ९८२२३८११४०, वंदना कुडव - ९६७३७९३८९६, नीलम पार्सेकर-९१३०९४७८२८, शशिकांत कोरकणकर - ८८०६७२२७७असे आवाहन भारत स्वाभिमान संघटनेचे पेडणे तालुका अध्यक्ष शशिकांत कोरकणकर यांनी केले आहे.

---

### पेडणे येथे १५ रोजी मराठीप्रेमींचा मेळावा

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. १० : गोव्यात कोकणी बरोबर मराठी भाषेलाही राजभाषेचा दर्जा द्यावा. या मागणीसाठी स्थापन झालेल्या मराठी राजभाषा निर्धार समितीच्या पेडणे प्रखंडातील मराठीप्रेमींचा मेळावा रविवार दि. १५ रोजी सकाळी १० वाजता पेडणे येथील श्रीभगवती हायस्कूल सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. गोव्यात मराठी भाषेला लाभलेली हजारो वर्षांची परंपरा काय आहे आणि मराठी राजभाषा का झालीच पाहिजे हे सर्वांना सविस्तर समजावे या उद्देशाने गेल्या एप्रिलपासून राज्यभरात कार्यकर्त्यांचे मेळावे आयोजित करण्यात येत आहेत. आतापर्यंत झालेल्या मेळाव्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे. या मेळाव्यास मराठी राजभाषा निर्धार समितीचे ज्येष्ठ मार्गदर्शक गो. रा. ढवळीकर आणि निमंत्रक तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्राचार्य सुभाष भास्कर वेलिंगकर हे मार्गदर्शन करणार आहेत.मराठी राजभाषा निर्धार समितीच्या केंद्रीय मार्गदर्शक मंडळाचे सदस्य प्राचार्य गजानन मांद्रेकर हे यावेळी उपस्थित असतील. साहित्यिक सोनाली परब सावळदेसाई, प्रसिद्ध वकील मंदार जोशी, युवा नाट्यकलाकार नवसो परब व युवा पत्रकार तथा संवादिनीवादक साहील नारूलकर हे नव्या पिढीचे प्रतिनिधीही यावेळी आपले विचार मांडतील. पेडणे येथील सुप्रसिद्ध चित्रकार तथा निवृत्त चित्रकला शिक्षक पी .ए.सूर्यवंशी यांच्या हस्ते पेडणेची ग्रामदेवता श्रीभगवती देवीला श्रीफळ व पुष्पमाला अर्पण करून या मेळाव्याचा शुभारंभ करण्यात येईल. पेडणे तालुक्यातील मराठीप्रेमी ग्रामस्थ, मराठीप्रेमी संस्थांचे पदाधिकारी, साहित्यिक, नाट्यकलाकार, गायक, वादक, कीर्तनकार, शिक्षक तसेच युवक,युवतींनी या मेळाव्यास आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन पेडणे प्रखंडाचे निमंत्रक शरद यशवंत गावडे यांनी केले आहे.

---

### पणजीत ३० रोजी डाक अदालत

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १०** : गोवा पोस्ट मास्टर जनरल यांच्यावतीने येत्या ३० रोजी सकाळी ११ वाजता टपाल विभागाची ६२वी प्रादेशिकस्तरीय डाक अदालत पणजीत आयोजित करण्यात आली आहे. या ग्राहकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यात येते. टपाल विभागाशी संबंधित ग्राहकांच्या विविध तक्रारी तसेच अडचणी ज्यांचे निवारण गेल्या ६ आठवड्यांच्या आत झाले नाही त्यांचा या डाक अदालतमध्ये विचार केला जातो. टपाल, स्पीड पोस्ट, काऊंटर सेवा, बचत बँक सेवा आणि मनिऑर्डर न भरण्याशी संबंधित तक्रारींचा विचार या डाक अदालतमध्ये केला जाईल.

---

### मॉडेल मडागवतर्फे बाल आरोग्य शिबिराला प्रतिसाद

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १० : मॉडेल मडगावतर्फे सामाजिक उपक्रमांतर्गत नगर्सेकर क्लासिक इस्पितळात आयोजित बाल आरोग्य शिबिराला प्रतिसाद लाभला आहे. आमदार दिगंबर कामत, योगिराज कामत उपस्थित होते. बालरोगतज्ज्ञ डॉ. सुहेल नगर्सेकर यांनी आपले विचार मांडले. डॉ. नगर्सेकर, डॉ. सोनल नगर्सेकर, डॉ. बन्सी खवंटे, डॉ. नील डिसोझा, सृष्टी प्रभुदेसाई यांनी तपासणी केली. पालकांना उपचाराबाबत मार्गदर्शन केले. लिस्टन बारेटो यांनी आभार व्यक्त केले.

# साळमधील खारफुटीच्या अतिवृद्धीवर कारवाईची मागणी

## पारंपरिक मासेमारी क्रियाकलापांना अडथळा | आरोग्याला धोका : पर्यावरणाची ऱ्हास

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १०** : वेळ्ळीचे आमदार क्रूझ सिल्वा यांनी राज्य सरकारला साळ नदीकाठी असलेल्या खारफुटीच्या अनियंत्रित अतिवृद्धीवर तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. त्यांनी इशारा दिला आहे की, ही समस्या पारंपरिक मासेमारी क्रियाकलापांना अडथळा आणत आहे, सार्वजनिक आरोग्याला धोका निर्माण करत आहे आणि पर्यावरणाचा ऱ्हास करत आहे.

वनमंत्री विश्वजित राणे, पर्यावरण मंत्री आलेकस् सिक्वेरा आणि गोवा वनविकास महामंडळाच्या अध्यक्षा देविया राणे यांना लेखी आवाहन करताना, सिल्वा यांनी निदर्शनास आणून दिले की, कोलेवाडोपासून - केळशी - असोल्णा पुलाजवळ आंबेलीपर्यंत पसरलेल्या दाट खारफुटीच्या वनस्पतींमुळे नदीची जलवाहतूक रुंदी खूपच कमी झाली आहे. त्यांनी सांगितले की याचा पारंपारिक



कॅनोच्या हालचालीवर आणि पर्यायाने स्थानिक मच्छिमारांच्या उपजीविकेवर गंभीर परिणाम होत आहे.

खारफुटीच्या पर्यावरणीय महत्त्वाची कबुली देताना, सिल्वा यांनी संतुलित व्यवस्थापनाची गरज यावर भर दिला. ही अतिवृद्धी आता ढाल बनण्याऐवजी धोका बनत आहे, असे त्यांनी सांगितले. दाट झाडे डासांसाठी प्रजनन स्थळ बनली आहेत आणि नदीकाठच्या रहिवाशांसाठी गंभीर आरोग्य धोका निर्माण करत आहेत, असे नमूद करून ते म्हणाले.

आमदारांच्या मते, या विस्ताराचा आणखी एक अनपेक्षित परिणाम म्हणजे वटवाघळांची वाढती उपस्थिती, जी परिसरातील नारळाच्या बागांना नुकसान पोहोचवत आहे, ज्यामुळे कृषी अर्थव्यवस्थेवर परिणाम होत आहे. त्यांनी असेही म्हटले की, गुंतागुंतीचे खारफुटीचे समूह तरंगत्या प्लास्टिक आणि घनकचऱ्याच्या सापळ्यात बदलले आहेत, ज्यामुळे नदी आणखी प्रदूषित होत आहे.

सिल्वा यांनी सरकारला पर्यावरणीय अखंडतेशी तडजोड न करता खारफुटीच्या प्रसाराचे नियमन करण्यासाठी जमिनीवर तपासणी करण्याचे आणि तात्काळ उपाययोजना सुरू करण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी सांगितले की नदीवर अवलंबून असलेल्या समुदायांचे आरोग्य आणि कल्याण सुनिश्चित करण्यासाठी आणि दीर्घकालीन पर्यावरणीय नुकसान रोखण्यासाठी त्वरित आणि संतुलित हस्तक्षेप आवश्यक आहे.

# फोंडा मार्केटमधील विक्रेत्यांना मुख्यमंत्र्यांकडून दिलासा

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. १०** : जीर्ण झालेल्या मासळी बाजारात व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांना मिळालेली ७२ तासांची बेदखलीची नोटीस सध्या तरी स्थगित झाली असून, मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या तात्काळ हस्तक्षेपामुळे कापड विक्रेते, किराणा व्यापारी आणि शिंपी यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मुख्यमंत्र्यांनी फोंडा नगरपालिका प्रशासनाला आणि उपजिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत की, विक्रेत्यांशी चर्चा करून आणि त्यांच्या अडचणी लक्षात घेऊन स्थलांतराची योग्य योजना तयार करण्यात यावी.

सोमवारी फोंडा येथील एका शासकीय कार्यक्रमासाठी आलेल्या मुख्यमंत्र्यांची बाजारातील प्रभावित विक्रेत्यांनी भेट घेऊन पीएमसीकडून मिळालेल्या नोटिशीची माहिती दिली. त्यांनी बाजारातील परिस्थितीची कल्पना देऊन तत्काळ मदतीची मागणी केली. यास मुख्यमंत्र्यांनी तात्काळ प्रतिसाद देत पीएमसी च्या मुख्य अधिकाऱ्यांशी आणि उपजिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून, कोणत्याही निर्णयापूर्वी विक्रेत्यांशी सविस्तर चर्चा करूनच स्थलांतराचा पर्याय शोधावा, असे निर्देश दिले.

विक्रेत्यांनी सांगितले की, पीएमसीने मागील आठवड्यात अचानक नोटीस देत त्यांना जीर्ण मासळी बाजार रिकामा करून नगरपालिकेच्या एका दुसऱ्या मार्केट बिल्डिंगमध्ये स्थलांतर करण्यास सांगितले होते. मात्र, ती जागा व्यवसायासाठी अत्यंत असुविधाजनक आणि अपुरी असल्यामुळे विक्रेत्यांनी स्थलांतर नाकारले होते. त्यांनी पीएमसी कडे विनंती केली होती की, त्यांना नव्या मार्केट शेडमध्ये किंवा सुयोग्य जागी स्थलांतर करण्याची संधी द्यावी. परंतु पीएमसी ने या मागण्या फेटाळून लावल्याचे विक्रेत्यांचे म्हणणे आहे. यावर संतप्त विक्रेत्यांनी पीएमसी च्या कार्यालयासमोर आंदोलनाचा इशारा दिला होता. त्याच पार्श्वभूमीवर पीएमसी ने या विक्रेत्यांना ७२ तासांच्या आत जागा रिकामी करण्याचा इशारा दिला, ज्यामुळे विक्रेत्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

विक्रेते म्हणाले की, मुख्यमंत्र्यांनी आमची व्यथा ऐकून आम्हाला दिलासा दिला आहे. आता आम्हाला संबंधित अधिकाऱ्यांसोबत बसून योग्य पर्यायावर चर्चा करण्याची संधी मिळेल. मुख्यमंत्र्यांच्या निर्देशांनंतर पीएमसी आणि प्रशासनाकडून पुढील निर्णय अपेक्षित आहे.

पीएमसीच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, जीर्ण अवस्थेतील मासळी बाजार इमारत कधीही कोसळू शकते, आणि त्यामुळे विक्रेत्यांचे आणि ग्राहकांचे जीव धोक्यात येऊ शकतात. त्यामुळे सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने पुनर्वसन अत्यावश्यक आहे. मात्र, विक्रेत्यांना विश्वासात घेतल्याशिवाय कोणताही निर्णय घेतला जाणार नाही, असे सूत्रांनी स्पष्ट केले आहे. सध्या पीएमसी आणि प्रशासन स्थानिक विक्रेत्यांशी चर्चा करण्याच्या तयारीत असून, पुढील काही दिवसांत बैठका होणार आहेत. बाजारातील समस्या आणि पर्याय यावर सविस्तर चर्चा करून निर्णय घेतला जाणार आहे.

# ॲग्रीगेटर धोरणाविरोधात टॅक्सी चालकांना पाठिंबा कायम : आ. लोबो

■ टीम दैनिक हेराल्ड

**कळंगुट, दि. १०** : टॅक्सीचालकांनी दिलेल्या निवडणुकीतील गंभीर परिणामाच्या इशाऱ्याने प्रभावीत होउन राज्यात प्रस्तावित कॅब ॲग्रीगेटर टॅक्सी ॲप्सच्या विरोधात सध्या असलेल्या असंतोषाला आता किनारपट्टी भागातील काही आमदारांचे बळ मिळत आहे. कळंगुटचे आमदार मायकेल लोबो यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, राज्यातील सर्व किनारपट्टी भागातील आमदार हे नवीन कॅब ॲप्सच्या विरोधात आहेत. स्थानिक टॅक्सी चालकांच्या मागण्यांना आम्ही ठामपणे पाठिंबा देतो.

लोबो मंगळवारी कळंगुट येथे पत्रकारांशी संवाद साधत होते. त्यांनी सांगितले की, टॅक्सी वादावर चर्चा करण्यासाठी सोमवारी किनारपट्टी भागातील आमदार व मंत्र्यांची बैठक झाली. मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांचीही या बैठकीस उपस्थित राहण्याची योजना होती, मात्र गोवा वैद्यकीय महाविद्यालयातील (जीएमसी) एका महत्त्वाच्या घटनेमुळे ते उपस्थित राहू शकले नाहीत. लोबो पुढे म्हणाले की, सर्व आमदारांचे मत स्पष्ट आहे. राज्यात बाहेरील कॅब ॲग्रीगेटर कंपन्यांना प्रवेश देण्यास आम्ही विरोध करतो. टॅक्सी मालक जे मार्गदर्शक तत्त्वे रद्द करण्याची मागणी करत आहेत, ती पूर्णतः योग्य आहे. राज्यात स्थानिक टॅक्सी चालकांचे हित अबाधित राहावे यासाठी आम्ही त्यांच्यासोबत आहोत.

तथापि, लोबो यांनी भाड्याच्या बाबतीत पारदर्शकतेचा मुद्दा उपस्थित केला. ते म्हणाले, ग्राहकांना निश्चित व स्पष्ट भाड्याची माहिती व्हायला हवी. कोणत्याही स्वरूपातील सौदाबाजी किंवा फसवणूक टाळण्यासाठी डिजिटल पेमेंट आणि बिलिंग प्रणाली अनिवार्य असावी. ग्राहकांना त्यांच्या मोबाईलवर, व्हॉट्सॲपवर किंवा ईमेलद्वारे बिल मिळणे अपेक्षित आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'डिजिटल इंडिया' उपक्रमाचा दाखला देत, लोबो म्हणाले, भाड्याच्या व्यवहारात पारदर्शकता आवश्यक आहे. मी या दृष्टीने नेहमीच टॅक्सी मालकांच्या मागे उभा राहिलो आहे. मात्र, हे लक्षात घेतले पाहिजे की, कॅब ॲग्रीगेटर ॲप्स अंतर्गत स्थानिक टॅक्सी सेवा चालवणे स्थानिक चालकांसाठी आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरत नाही.

टॅक्सी मीटर संदर्भातही त्यांनी प्रशासनावर टीका केली. प्रशासनाने टॅक्सी चालकांना मीटर बसवण्यास भाग पाडले, मात्र प्रत्यक्षात कोणीही ते वापरत नाही. चालकांनी मीटर बसवण्यासाठी १२ हजार रुपये खर्च केले, आणि त्यानंतर दरवर्षी ५ हजार रुपये नूतनीकरणासाठी खर्चावे लागतात. पण या मीटरचा वापर शून्य आहे. त्यामुळे या यंत्रणेचा उपयोग काय ?असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

# एफडीएकडून खारेबांधमधील भोजनालय बंद करण्याचे आदेश

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १०** : खारेबंदमधील एका भोजनालयात गंभीर स्वरूपाचे स्वच्छता आणि सुरक्षा उल्लंघन आढळल्याने अन्न आणि औषध प्रशासनाच्या (एफडीए) आरोग्य अधिकाऱ्यांनी संबंधित भोजनालय तात्काळ बंद करण्याचे आदेश दिले आहेत.

एफडीएच्या तपासणी पथकाने संज्योत कुडाळकर यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई केली. ही मोहीम राज्यभरातील अन्न व्यवसायांमध्ये आरोग्य आणि स्वच्छतेच्या नियमांचे काटेकोर पालन होत आहे की नाही, याची खातरजमा करण्यासाठी सुरू आहे.

तपासणीदरम्यान अधिकाऱ्यांना भोजनालयात अनेक धोकादायक त्रुटी आढळल्या. परिसर अत्यंत अस्वच्छ अवस्थेत होता. वापरले जाणारे पाणी कुठून आणले जात होते, याची कोणतीही माहिती नव्हती. शिवाय, सांडपाणी थेट उघड्यावर सोडले जात होते, असे कुडाळकर यांनी तपासणीनंतर पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले.

इतकेच नव्हे तर, रेस्टॉरंटमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडे वैध आरोग्य प्रमाणपत्र नव्हते. तसेच, अन्न हाताळताना आवश्यक असलेल्या संरक्षक उपकरणांचा (जसे की हेड कव्हर) वापर केला जात नव्हता. या सर्व बाबींचा गंभीर विचार करून एफडीएने सदर भोजनालय सार्वजनिक आरोग्यास अपायकारक असल्याचे ठरवले आणि तातडीने बंद करण्याचे आदेश दिले.

तपासणीच्या वेळी भोजनालयाचा मालक शहराबाहेर असल्याचे समजले. अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, संबंधित त्रुटींचे समाधान न करता भोजनालय पुन्हा सुरू करण्यास परवानगी दिली जाणार नाही. तपासणी पथकाने जुन्या बाजारात भरविण्यात आलेल्या मेळाव्यातील अन्न स्टॉल्सचीही तपासणी केली. यामध्ये अन्न हाताळणीची गुणवत्ता आणि स्वच्छतेच्या नियमांचे पालन यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले.

राज्यातील सार्वजनिक आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी आणि पर्यटकांच्या संपर्कात येणाऱ्या अन्न स्टॉल्समुळे कोणताही धोका निर्माण होऊ नये, यासाठी एफडीएने हंगामी मेळ्यांवरील आणि पर्यटन क्षेत्रांतील अन्न प्रतिष्ठानांवर तपासण्या अधिक तीव्र केल्या आहेत.

# अपूर्ण गटारामुळे पावसाचे पाणी रस्त्यावर; नागरिकांची तक्रार

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. १०** : बोंडबाग-बेतोडा येथील नव्याने बांधलेल्या चार पदरी महामार्गावर अपूर्ण गटारांची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. यामुळे परिसरातील अंतर्गत रस्त्यांवर पावसाचे पाणी साचून रहदारीस अडथळा निर्माण होत आहे. विशेषतः प्राथमिक शाळेकडे जाणाऱ्या रस्त्यावर पाण्याचा मोठा साठा झाल्याने विद्यार्थी व स्थानिक नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

महामार्गालगतचे गटार अपूर्ण राहिल्याने त्यातील पाणी नाल्यात वाहून जाण्यास कोणताही मार्ग उपलब्ध नाही. त्यामुळे अल्प पावसातही रस्ते जलमय होतात आणि परिसरातील वाहतुकीवर परिणाम होतो. या समस्येवर तातडीने तोडगा काढावा, अशी जोरदार मागणी स्थानिकांनी केली आहे.



या संदर्भात स्थानिक नागरिकांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण तसेच बेतोडा ग्रामपंचायतीकडे तक्रार करत या समस्येकडे तातडीने लक्ष देण्याची विनंती केली आहे. गटाराचे बांधकाम पूर्ण करून त्यातील पाणी जवळच्या नाल्यात वळवण्यात यावे, अशी नागरिकांची स्पष्ट मागणी आहे.

बोंडबाग येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक सदानंद गावडे, ज्ञानेश्वर गावडे, ज्ञानेश्वर खांडेपारकर आणि इतरांनी माध्यमांशी बोलताना ही समस्या मांडली. सदानंद गावडे यांनी सांगितले की, चार पदरी महामार्गाचे काम झाले असले तरी गटाराचे काम अर्धवट आहे. परिणामी, पावसात मुख्य रस्त्यावर पाणी साचते आणि विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो.

# कुंडईममध्ये घरफोडी प्रकरणात भाडेकरू अटकेत

## ४.५ लाखांचे सोने आणि १२ हजार चोरले

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. १०** : कुंडई येथील एका घरात घरफोडी करून सुमारे ४.५ लाख रुपये किमतीचे सोने आणि १२ हजार रुपये रोख रक्कम चोरणाऱ्या भाडेकरूस म्हार्दोळ पोलिसांनी अटक केली आहे. प्रदीप नवैत मूळ राहणार - मध्य प्रदेश, सध्या राहणार - कुंडई असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. हा प्रकार ९ रोजी घडला होता.

मिळालेल्या माहितीनुसार, घरमालक सुचिता नाईक या आपल्या दोन मुलांसह राहतात. त्यांनी आरोपी नवैत याला घरात एक खोली भाड्याने दिली होती. घटनेच्या दिवशी सकाळी सुचिता कामावर आणि मुले शाळेत गेल्यानंतर, घरात कोणीही नसताना आरोपीने ही चोरी केली. त्याने घराच्या मागील दरवाज्याचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि कपाटातील सुमारे ४.५ लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व १२ हजार रुपये रोख रक्कम लंपास केली.

विशेष म्हणजे, चोरी करूनही आरोपीने घर सोडले नाही, जेणेकरून आपल्यावर संशय येऊ नये. मात्र, पोलिसांनी तात्काळ तपास हाती घेत आरोपीला थेट चौकशीसाठी ताब्यात घेतले आणि प्राथमिक चौकशीतच त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर त्याच्याविरुद्ध घरफोडी आणि चोरीचा गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली.

सुचिता नाईक यांनी म्हार्दोळ पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, अज्ञात व्यक्तीने ९ जून रोजी दुपारी ३.३० वाजण्याच्या अगोदर त्यांच्या घरात प्रवेश करून दागिने व रोख रक्कम चोरी केली होती.

स्थानिक नागरिकांनीही या घटनेबाबत तीव्र संताप व्यक्त केला असून, गरीब कुटुंबाच्या घरातील सर्व चोरी गेलेल्या वस्तू आणि रक्कम तातडीने जप्त करून परत मिळवून द्याव्यात, तसेच गुन्ह्याचा मुळापर्यंत शोध घेण्याची मागणी केली आहे. म्हार्दोळ पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून आरोपीकडून चोरी गेलेल्या मालमत्तेचा तपशीलवार तपास केला जात आहे.